# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६१७९६९ , फॅक्स - २२६९०००७
E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


रजिस्टर्ड एडी/ ई-मेलद्वारे

जा.क्र.१८/तशिसं/ईबीसी/२०१८/२९३
दिनांक : २०/०८/२०१८

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : **खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरणाकडून शैक्षणिक शुल्क मान्यता घेणेबाबत...**

. सन २०१८-१९ करिता महाराष्ट्र राज्यातील सर्व शिष्यवृत्ती योजनांच्या अटी व शर्तीनुसार माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय (डी.आय.टी.) यांचेकडून, राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील सर्व शिष्यवृत्ती योजनांसाठी सामाईक डी.बी.टी पोर्टल बनविण्याचे कामकाज सुरु आहे. त्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचा समावेश करण्यात आलेला असून त्यामध्ये शैक्षणिक शुल्काची नोंद करणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणी करताना, आपल्या विभागाच्या अखत्यारित येत असलेल्या खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी सदर पोर्टलवर शैक्षणिक शुल्काची नोंद घेण्याकरिता शैक्षणिक शुल्क नियामक प्राधिकरण यांचेकडून शैक्षणिक शुल्क निश्चित करणे आवश्यक आहे. याबाबत पुढीलप्रमाणे आपल्या अधिनस्त संस्थांना आपल्या स्तरांवर स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

- खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी शैक्षणिक शुल्क मंजूरीबाबतचा प्रस्ताव सन २०१८-१९ करिता जर केला नसेल तर **शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरण** [ Fee Regulating Authority (FRA) ] यांना त्वरित सादर करावा.
- **शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरण** यांचेकडून व्यावसायिक अभ्यासक्रमांस मान्यता प्राप्त असलेल्या वर्ष निहाय शैक्षणिक शुल्काची रक्कमेची नोंद संबंधित संस्थांनी शासनाच्या शिष्यवृत्तीच्या समाईक पोर्टलवर अद्ययावत करण्यात यावी.
- शासन निर्देशाप्रमाणे शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांस अनुज्ञेय असणाऱ्या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम ही संबंधित विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी आगाऊ स्वरुपात घेऊ नये व विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही याची खात्री संबंधित संस्था करेल.
- ज्या खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना सन २०१८-१९ करिता शिक्षण शुल्क आकारण्याबाबतची मान्यता शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरण यांचेकडून प्राप्त झालेली नसेल अशा संस्थांना महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ देता येणार नाही परिणामस्वरुप शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना मंजूर झाली नाही याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.
- आपल्या विभागांतर्गत संस्थांनी शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरण यांचेकडून सन २०१८-१९ करिता शिक्षण शुल्क निश्चितीचे प्रस्तावाबाबतचा आढावासुध्दा वेळोवेळी आपल्या स्तरांवर घेण्यात यावा.
-

( डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रत - कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २, २अ, ३,१० मुख्य कार्यालय,मुंबई यांना माहीतीसाठी.